जनसपक कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 AUG 2026

पुण्यनगरी

# विद्यार्थिकेंद्रित शिक्षण हे नव्या शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट

## प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचे प्रतिपादन



पलूस : प्रतिनिधी

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थी समाजाशी बांधला जाऊन समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी तो सक्षम व्हावा, तरच शिक्षणाचा खरा उद्देश स्पष्ट होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

पलूस शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या ३४व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी सभापती तमनगौडा रवी-पाटील होते. यावेळी पलूस शिक्षण प्रसारक मंडळास सामाजिक आणि शैक्षणिक कार्यासाठी राज्यस्तरीय आदर्श संस्था पुरस्कार मिळाल्याबद्दल आणि महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थी आणि शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. जाधव म्हणाल्या की, गेल्या छत्तीस वर्षात अनुभवाची शिदोरी घेऊन शिक्षण प्रवासात शिक्षक आणि संशोधक म्हणून वावरतांना मुलींच्या शिक्षणाविषयी मला खूपच आस्था वाटत आली आहे. म्हणूनच जिथे मुली जास्त त्या महाविद्यालयात मला जायला खूप आवडते. त्यातूनच अनेक ठिकाणी कार्यक्रम निमित्ताने फिरताना तिथला अनुभव घेऊन मी माझ्या आयुष्याची वाटचाल सातत्याने करत असते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तमनगौडा रवि पाटील म्हणाले की, ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांच्या साठी शिक्षण संस्था कार्यरत असताना येथील महाविद्यालय जे उपक्रम राबवतात ते खूपच आदर्शवत असतात. त्याचा प्रत्यय या पलूस महाविद्यालयास भेट दिल्यानंतर आला. इथे विद्यार्थी घडतो यासारखे चांगले काम आज कोणतेही नाही.

यावेळी विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळेचे शार्दुल सेलूकर, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे गुरुदत्त खानोलकर, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. उमेश पाटील, उपाध्यक्ष सचिनकुमार सावंत यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पलूस शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पुदाले, उपाध्यक्ष संदेश कुलकर्णी, सचिव धोंडीराम शिंदे, सदस्य प्रशांत कुलकर्णी व जयंत कदम हे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. आर. एस. साळुंखे यांनी आढावा घेतला. प्रास्ताविक प्रा. डॉ. संगीता पाटील यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डी. व्ही. भाट यांनी करून दिला. आभार प्रा. डॉ. पी. एम. पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. संपतराव पार्लेकर आणि प्रा. शुभम गायकवाड यांनी केले.

2 6 AUG 2026

जनप्रवास



कोल्हापूर : रिल्स मेकिंग स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र वितरण करताना प्रा. डॉ. ज्योती जाधव. सोबत डॉ. शिवाजी जाधव, प्रा. डॉ. प्रतिभा देसाई.

# रिल्स मेकिंग स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात मतदान जनजागृतीसाठी आयोजित रिल्स मेकिंग स्पर्धेत बक्षीस मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव केला. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले. मास कम्युनिकेशन विभाग, बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन केले होते. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, बेटी बचाव अभियानाच्या समन्वयक प्रा. डॉ. प्रतिभा देसाई, विद्यार्थी विकास विभागाचे तत्कालीन संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी परीक्षण केले. या स्पर्धेत प्रफुल्ल कराडे (प्रथम), शहाजी निंबाळकर (द्वितीय), समृद्धी मोदक (तृतीय) तर प्रज्ञा भांदिगरे (उत्तेजनार्थ) आदींना प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण केले. यावेळी डॉ. शिवाजी जाधव, बेटी बचाव अभियानाच्या समन्वयक प्रा. डॉ. प्रतिभा देसाई यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

2 6 AUG 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुरु आणि शिष्य परंपरेचा सुरेल, नृत्यमय आविष्कार

| त. भा. प्रतिनिधी, कोल्हापूर

पद्मालया नृत्यशालेच्या संस्थापिका पद्मश्री बागडेकर यांच्या संकल्पनेतून गुरुपौर्णिमेनिमित्त शाहू स्मारक भवन येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भारतीय शास्त्रीय नृत्यकलेतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणारा हा कार्यक्रम अत्यंत भक्तिमय, कलात्मक आणि शिस्तबद्ध वातावरणात उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, संगीत विभागाचे विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई तसेच ज्येष्ठ गुरू मोहिनी दिवाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली. पद्मालया नृत्यशालेतील विद्यार्थिनींनी भरतनाट्यमच्या विविध नृत्यरचना सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात 'श्लोकांजली' या सुंदर नृत्यरचनेने झाली. त्यानंतर पुष्पांजली, मिश्र अलारीपू, ज्योती स्वरम्, शिवकीर्तन, श्रीरामचंद्र कृपाल भजन, भक्ती पदम्, जावळी, देवी कीर्तनम् आणि तिल्लाना अशा विविध नृत्यरचनांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.



पद्मालया नृत्यशालेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थिनी व उपस्थित इतर मान्यवर.

## पद्मालया नृत्यशालेतर्फे गुरुपौर्णिमा उत्साहात

विशेष आकर्षण ठरलेल्या 'श्रीरामचंद्र कृपाल भजन" या नृत्यरचनेत सीता स्वयंवर आणि शबरी मोक्ष हे प्रसंग अत्यंत प्रभावी भावमुद्रा, अभिनय आणि नृत्याच्या माध्यमातून सादर करण्यात आले. निधी सावर्डेकर, वैभवी कापसे आणि प्रेरणा धोत्रे यांनी या सादरीकरणात विशेष योगदान दिले. पद्मालया नृत्यशालेच्या माजी शिष्य नीलम येसाटे, अमृता घनदुरे, सागर माने आणि भाग्यश्री कालेकर यांनीही नृत्यसादरीकरण करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. समारोपावेळी 'मंगळम्' म्हणून 'स्वामी मंगळम्' हे सादर करण्यात आले. स्वामी समर्थांच्या गीतावर पद्मश्री बागडेकर यांनी केलेले नृत्यसादरीकरण विशेष भावस्पर्शी ठरले.

2 6 AUG 2026

सकाळ

# प्रभा गणोरकर, रवी कोरडे यांना काळसेकर काव्य पुरस्कार जाहीर

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा यावर्षीचा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांना, तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' रवी कोरडे यांना जाहीर झाला. नियतकालिकांचे संपादन व लघुनियतकालिक चळवळीत सक्रिय सहभाग असणाऱ्या काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार देण्यात येतो.

विद्यापीठात लवकरच पुरस्कार प्रदान कार्यक्रम होईल, अशी माहिती डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली. एकवीस हजार रुपये, सन्मानचिन्ह, असे सतीश काळसेकर काव्य पुरस्काराचे, तर दहा हजार रुपये, स्मृतिचिन्ह असे ऋत्विज काळसेकर पुरस्काराचे स्वरूप आहे. गणोरकर या मूळच्या अमरावती येथील असून, मराठीतील ज्येष्ठ कवयित्री आणि समीक्षक म्हणून त्यांची साहित्यविश्वाला ओळख आहे. त्यांचे



प्रभा गणोरकर



रवी कोरडे

'विवर्त', 'व्यतीत' व 'व्यामोह' हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. निसर्ग आणि सृष्टीविषयीचे एक वेगळे संवेदन त्यांच्या काव्यसृष्टीत आहे.

कोरडे यांचे 'धूसर झालं नसतं गाव', 'भुंड्या डोंगरांचे दिवस' हे महत्त्वाचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. कृषी जीवनातील पडझड, ग्रामीण व मानवी जीवनातील गुंतागुंत, ग्रामीण माणसाचे मातीशी असणारे घट्ट नाते, हरवलेल्या भूतकाळ व मातीवरील गाढ निष्ठेची ही कविता आहे. पुरस्कार निवड समितीचे काम प्रा. नीतीन रिंढे, नंदकुमार मोरे, प्रा. शिंदे यांनी पाहिले.

2 6 AUG 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, को

# सतीश काळसेकर काव्य पुरस्कार गणोरकर यांना जाहीर

## 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' कोरडे यांना जाहीर : डॉ. रणधीर शिंदे

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२६ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांना तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' रवी कोरडे यांना जाहीर करण्यात आला आहे. नियतकालिकांच्या संपादन व लघुनियतकालिक चळवळीत सक्रीय सहभाग असणाऱ्या सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार देण्यात येतो. शिवाजी विद्यापीठात लवकरच पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात येईल, अशी माहिती डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली आहे.

काळसेकर कुटुंबीयांच्या वतीने सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून काव्य क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या कवींना 'सतीश



प्रभा गणोरकर



रवी कोरडे

काळसेकर काव्य पुरस्कार' देण्यात येतो. तर, आश्वासक कविता लेखन करणाऱ्या तरुण कवीला 'ऋत्विज काळसेकर पुरस्काराने' सन्मानित करण्यात येते. 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' कवयित्री व समीक्षक प्रभा गणोरकर यांना देण्यात येत आहे. प्रभा गणोरकर या अमरावती येथील असून मराठीतील कवयित्री आणि समीक्षक म्हणून त्यांची साहित्यविश्वाला ओळख आहे. आधुनिक स्त्रीची संवेदनशीलता व तिच्या अस्तित्वाशी निगडीत वेगवेगळे प्रश्न गणोरकर यांच्या कवितेतून अभिव्यक्त झाले आहेत. निसर्ग आणि सृष्टीविषयीचे एक वेगळे संवेदन त्यांच्या काव्यसृष्टीत आहे. नव्या पिढीतील आश्वासक काव्य लेखनासाठी दिला जाणारा 'ऋत्विज काळसेकर पुरस्कार' हा छत्रपती संभाजीनगर येथील कवी रवी कोरडे यांना जाहीर झाला. त्यांचे धूसर झालं नसतं गाव, 'भुंड्या डोंगरांचे दिवस' हे महत्वाचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. कृषी जीवनातील पडझड, ग्रामीण व मानवी जीवनातील गुंतागुंत, ग्रामीण माणसाचे मातीशी असणारे घट्ट नाते, हरवलेल्या भूतकाळ व मातीवरील गाढ निष्ठेची ही कविता आहे. रवी कोरडे यांना यापूर्वी युवा साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 6 AUG 2026

वर्तमान

# शिवाजी विद्यापीठाचे काळसेकर काव्य पुरस्कार प्रभा गणोरकर आणि रवी कोरडे यांना जाहीर

कोल्हापूर/प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२६ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांना तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' रवी कोरडे यांना जाहीर करण्यात आला आहे. नियतकालिकांच्या संपादन व लघुनियतकालिक चळवळीत सक्रीय सहभाग असणाऱ्या सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार देण्यात येतो. शिवाजी विद्यापीठात लवकरच पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात येईल, अशी माहिती डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली आहे.



काळसेकर कुटुंबियांच्या वतीने सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून काव्य क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या कवींना 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' देण्यात येतो. रुपये २१,०००/- आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तर, आश्वासक कविता लेखन करणाऱ्या तरुण कवीला 'ऋत्विज काळसेकर पुरस्काराने' सन्मानित करण्यात येते. या पुरस्काराचे स्वरूप रुपये १०,०००/- आणि सन्मानचिन्ह असे आहे.

'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री व समीक्षक प्रभा गणोरकर यांना देण्यात येत आहे. प्रभा गणोरकर या मूळच्या अमरावती येथील असून मराठीतील ज्येष्ठ कवयित्री आणि समीक्षक म्हणून त्यांची साहित्यविश्वाला ओळख आहे. त्यांचे 'विवर्त', 'व्यतीत' व 'व्यामोह' हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. गणोरकर यांची कविता



पुरुषी पर्यावरणात स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या यातनामय आयुष्याचे अत्यंत गंभीर व संयत स्वरात केलेलं आर्त प्रकटन आहे. आधुनिक स्त्रीची संवेदनशीलता व तिच्या अस्तित्वाशी निगडीत वेगवेगळे प्रश्न गणोरकर यांच्या कवितेतून अभिव्यक्त झाले आहेत. निसर्ग आणि सृष्टीविषयीचे एक वेगळे संवेदन त्यांच्या काव्यसृष्टीत आहे.

नव्या पिढीतील आश्वासक काव्य लेखनासाठी दिला जाणारा 'ऋत्विज काळसेकर पुरस्कार' हा छत्रपती संभाजीनगर येथील कवी रवी कोरडे यांना जाहीर झाला. त्यांचे 'धूसर झालं नसतं गाव', 'भुंड्या डोंगरांचे दिवस' हे महत्वाचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. कृषी जीवनातील पडझड, ग्रामीण व मानवी जीवनातील गुंतागुंत, ग्रामीण माणसाचे मातीशी असणारे घट्ट नाते, हरवलेल्या भूतकाळ व मातीवरील गाढ निष्ठेची ही कविता आहे. रवी कोरडे यांना यापूर्वी युवा साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

काळसेकर काव्य पुरस्काराचे हे पाचवे वर्ष असून सतीश काळसेकर काव्य पुरस्कार यापूर्वी वसंत आबाजी डहाके, नारायण कुलकर्णी-कवठेकर, अनुराधा पाटील, अरुणचंद्र गवळी यांना देण्यात आला आहे. तर ऋत्विज काळसेकर पुरस्कार दिशा पिंकी शेख, वर्जेश सोळंकी, वीरधवल परब, फेलिक्स डिसोजा यांना देण्यात आला आहे. पुरस्कार निवड समितीचे प्रा. नीतीन रिंढे (मुंबई), प्रा. नंदकुमार मोरे (कोल्हापूर) व प्रा. रणधीर शिंदे यांनी काम पाहिले

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

2 6 AUG 2026

आरउंट व्ह्यू

# काळसेकर काव्य पुरस्कार प्रभा गणोरकर आणि रवी कोरडे यांना जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२६ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांना तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' रवी कोरडे यांना जाहीर करण्यात आला आहे. नियतकालिकांच्या संपादन व लघुनियतकालिक चळवळीत सक्रीय सहभाग असणाऱ्या सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार देण्यात येतो. शिवाजी विद्यापीठात लवकरच पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात येईल, अशी माहिती डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली आहे.

काळसेकर कुटुंबियांच्या वतीने सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून काव्य क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या कवींना 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' देण्यात येतो. रुपये २१,०००/- आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तर, आश्वासक कविता लेखन करणाऱ्या तरुण कवीला 'ऋत्विज काळसेकर पुरस्काराने' सन्मानित करण्यात येते. या पुरस्काराचे स्वरूप रुपये १०,०००/- आणि सन्मानचिन्ह असे आहे.

'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री व समीक्षक प्रभा गणोरकर यांना देण्यात येत आहे. प्रभा गणोरकर या मूळच्या अमरावती येथील असून मराठीतील ज्येष्ठ कवयित्री आणि समीक्षक म्हणून त्यांची साहित्यविश्वाला ओळख आहे. त्यांचे 'विवर्त', 'व्यतीत' व 'व्यामोह' हे





कवितासंग्रह प्रकाशित आहेत. गणोरकर यांची कविता पुरुषी पर्यावरणात स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या यातनामय आयुष्याचे अत्यंत गंभीर व संयत स्वरात केलेलं आर्त प्रकटन आहे. आधुनिक स्त्रीची संवेदनशीलता व तिच्या अस्तित्वाशी निगडीत वेगवेगळे प्रश्न गणोरकर यांच्या कवितेतून अभिव्यक्त झाले आहेत. निसर्ग आणि सृष्टीविषयीचे एक वेगळे संवेदन त्यांच्या काव्यसृष्टीत आहे.

2 6 AUG 2026

पुढारी

# 'प्रभा गणोरकर, रवी कोरडे यांना 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार'

## शिवाजी विद्यापीठात लवकरच प्रदान सोहळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे दिला जाणारा २०२६ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री व समीक्षक प्रभा गणोरकर यांना तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' युवा कवी रवी कोरडे यांना जाहीर झाला आहे. विद्यापीठात लवकरच पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ काळसेकर कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीतून हा पुरस्कार दिला जातो. काव्य क्षेत्रातील मौलिक योगदानासाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्काराचे स्वरूप २१ हजार रुपये व सन्मानचिन्ह असे आहे. आश्वासक कविता लेखन करणाऱ्या युवा कवीला देण्यात येणाऱ्या 'ऋत्विज काळसेकर पुरस्काराचे' स्वरूप दहा हजार रुपये व सन्मानचिन्ह आहे.

अमरावती येथील प्रभा गणोरकर यांच्या 'विवर्त', 'व्यतीत' आणि 'व्यामोह' या कवितासंग्रहांना साहित्यविश्वात विशेष स्थान आहे. स्त्रीजीवनातील वेदना, आधुनिक स्त्रीचे प्रश्न तसेच निसर्गाविषयीचे संवेदनशील भान त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. छत्रपती संभाजीनगर येथील रवी कोरडे यांचे 'धूसर झालं नसतं गाव' आणि 'भुंड्या डोंगरांचे दिवस' हे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. ग्रामीण जीवन, कृषी संस्कृती, मातीशी नाते आणि बदलत्या ग्रामीण वास्तवाचे चित्रण त्यांच्या कवितेत आढळते. त्यांना यापूर्वी युवा साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. पुरस्काराचे हे पाचवे वर्ष आहे. निवड समितीत प्रा. नितीन रिंढे, प्रा. नंदकुमार मोरे व प्रा. रणधीर शिंदे यांचा समावेश होता.



प्रभा गणोरकर



रवी कोरडे

2 6 AUG 2026

लोकसत्ता

# प्रभा गणोरकर, रवी कोरडे यांना पुरस्कार



प्रभा गणोरकर



रवी कोरडे

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२६ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांना तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' रवी कोरडे यांना जाहीर करण्यात आला आहे.

दोन्ही पुरस्कार अनुक्रमे २१ हजार रुपये, सन्मानचिन्ह, १० हजार रुपये सन्मानचिन्ह अशा स्वरूपाचे आहेत, अशी माहिती डॉ. रणधीर शिंदे यांनी मंगळवारी दिली. प्रभा गणोरकर या मूळच्या अमरावती येथील असून मराठीतील ज्येष्ठ कवयित्री आणि समीक्षक म्हणून त्यांची साहित्यविश्वाला ओळख आहे. त्यांचे 'विवर्त', 'व्यतीत' व 'व्यामोह' हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील कवी रवी कोरडे यांचे 'धूसर झालं नसतं गाव', 'भुंड्या डोंगरांचे दिवस' हे महत्त्वाचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. पुरस्कार निवड समितीचे प्रा. नीतीन रिंढे (मुंबई), प्रा. नंदकुमार मोरे (कोल्हापूर) व प्रा. रणधीर शिंदे यांनी काम पाहिले.

2 6 AUG 2026

तरुण भारत

# तृतीयपंथीयांसाठीच्या कायद्यावर कार्यशाळा

कोल्हापूर : राज्य शासनाचे सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय व शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'तृतीयपंथी कल्याण, हक्क व संरक्षण कायदा २०१९ व सुधारित नियम २०२०' या विषयावर गुरुवार दि. २७ रोजी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत असणार आहेत. पोलीस अधीक्षक नीलोत्पल, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सहायक आयुक्त (समाजकल्याण) सचिन साळे, समाजकल्याण अधिकारी अक्षय कुरणे, सचिन परब यांची प्रमुख उपस्थित असणार आहेत. दोन सत्रात ही कार्यशाळा होणार आहे, अशी माहिती सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी दिली.

2 6 AUG 2026

सकाळ

# 'तृतीयपंथी कल्याण, हक्क'वर उद्या कार्यशाळा

कोल्हापूर : सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे 'तृतीयपंथी कल्याण, हक्क व संरक्षण कायदा २०१९ व सुधारित नियम २०२०' या विषयावर गुरुवारी (ता. २७) सकाळी दहा वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात कार्यशाळा होणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. आर. के. कामत असतील. कार्यशाळेत 'तृतीयपंथी समजून घेताना' या विषयावर तृतीयपंथी हक्क व तक्रार निवारण जिल्हास्तरीय समितीच्या सदस्य शिवानी गजबर, तर 'तृतीयपंथी कायदे व धोरणाबाबत सामाजिक जनजागृती' या विषयावर सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे अविनाश भाले मार्गदर्शन करतील, अशी माहिती या केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी दिली.

2 6 AUG 2026

डेलीप्रवास

# तृतीयपंथी संरक्षण कायदा विषयावर उद्या कार्यशाळा

कोल्हापूर : महाराष्ट्र शासनाचे सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारा, २७ रोजी सकाळी १० वाजता कार्यशाळा आहे. 'तृतीयपंथी कल्याण, हक्क व संरक्षण कायदा २०१९ व सुधारित नियम २०२०' हा या कार्यशाळेचा विषय आहे. ही कार्यशाळा मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. राजनीश कामत भूषविणार आहेत.

जनसंपर्क कक्ष

2 6 AUG 2026 वर्तमान शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'तृतीयपंथी कल्याण, हक्क व संरक्षण कायदा' विषयावर गुरूवारी कार्यशाळा

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाचे सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'तृतीयपंथी कल्याण, हक्क व संरक्षण कायदा २०१९ व सुधारित नियम २०२०' या विषयावर येत्या गुरुवारी, दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कोल्हापूरचे जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत असतील.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नीलोत्पल, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सहायक आयुक्त (समाजकल्याण) सचिन साळे, समाजकल्याण अधिकारी अक्षय कुरणे, सचिन परब आदी उपस्थित राहणार आहेत.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात 'तृतीयपंथी समजून घेताना' या विषयावर तृतीयपंथी हक्क व तक्रार निवारण जिल्हास्तरीय समिती, कोल्हापूरच्या सदस्य शिवानी गजबर, तर दुसऱ्या सत्रात 'तृतीयपंथी कायदे व धोरणाबाबत सामाजिक जनजागृती' या विषयावर सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे अविनाश भाले मार्गदर्शन करतील.

तृतीयपंथीय समुदायाच्या सामाजिक समावेशनासाठी केवळ कायदे करणे पुरेसे नसून त्याबाबत समाजात जागृती निर्माण करणे, शासकीय यंत्रणांना संवेदनशील करणे आणि उपलब्ध हक्क व संरक्षणाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. या अनुषंगाने कार्यशाळेत कायदे, धोरणे, सामाजिक वास्तव आणि तृतीयपंथीयांच्या हक्कांशी संबंधित विविध बाबींवर सविस्तर चर्चा होणार आहे. कार्यशाळेच्या माध्यमातून प्राध्यापक, विद्यार्थी, शासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित घटकांमध्ये तृतीयपंथीयांच्या हक्कांविषयी संवेदनशीलता व कायदेशीर जाणीव निर्माण होण्यास मदत होणार आहे. तरी या कार्यशाळेत संबंधितांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी केले आहे.

2 6 AUG 2026

तरुण भारत

# 'संविधान जागर'अंतर्गत आज व्याख्यान

कोल्हापूर : भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'संविधान जागर' ही वार्षिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात येते. बुधवार, २६ ऑगस्ट पासून दर महिन्याच्या २६ तारखेला सकाळी ११ वाजता सदर व्याख्यानमालेअंतर्गत तज्ज्ञ अभ्यासक, विचारवंत यांचे व्याख्यान शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या युट्यूब वाहिनीद्वारे ऑनलाइन स्वरुपात प्रसारित करण्यात येते. 'संविधान जागर' व्याख्यानमालेअंतर्गत बुधवार, २६ ऑगस्ट रोजी अखेरचे तेरावे पुष्प शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा संचालक आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर गुंफणार आहेत. 'भारतीय संविधानाची प्रास्ताविका' या विषयावर त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

26 AUG 2026


सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

Estd : 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

ज्ञानाच्या कक्षेतून यशाच्या दिशेने.... आता, ऑनलाईन!



शिका... कुठेही, कधीही!

**ऑनलाईन व डिस्टन्स मोड अभ्यासक्रम**

उज्ज्वल भविष्यासाठी खात्री!

### ऑनलाईन व डिस्टन्स मोड अभ्यासक्रम

- ☑ बी.ए. (डिस्टन्स मोड)
- ☑ बी.कॉम. (डिस्टन्स मोड)
- ☑ एम.ए. (डिस्टन्स मोड)
  (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र)
- ☑ एम.बी.ए. (ऑनलाईन व डिस्टन्स मोड)
- ☑ एम.कॉम (ऑनलाईन व डिस्टन्स मोड)
- ☑ एम.एस्सी. (गणित) (ऑनलाईन व डिस्टन्स मोड)
- ☑ प्रमाणपत्र अभ्यासक्रम



आजच प्रवेश घ्या आणि उज्ज्वल भविष्यासाठी सुरुवात करा!

अधिक माहितीचा तपशील विद्यापीठ संकेतस्थळाच्या खालील लिंकवर https://online.unishivaji.ac.in/admissions/ उपलब्ध किंवा खालील क्रमांकावर अथवा ई-मेलवर संपर्क साधावा.

अंतिम प्रवेशाची मुदत १०.०९.२०२६

अभ्यासक्रम, प्रवेश व इतर माहितीसाठी संपर्क साधा.
0231-2609451, 260945[illegible], 2609409

cde@unishivaji.ac.in

जावक क्रमांक : शिवाजी वि./सीडीओई/५४८ दि. २६.०८.२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव